महाराष्ट्र शासन

# अमृत महोत्सव नदी यात्रा.

## “चला,जाणुया नदीला”

## नदीचे नाव:- म्हाळुंगी नदी.

## जिल्हा:- नाशिक & अहमदनगर.

नदी प्रहरी सदस्य:- इंजि.*श्री.संपतराव देशमुख.*

*डॉ.दशरथ रूपवते*

*श्री.विरेश अडेप.*

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| 1 | नदीचा परीचय. | |
| 2 | नदी संवाद यात्रा. | |
| 3 | नकाशे. | |
| 4 | नदी खोऱ्यातील वनक्षेत्र आणि त्यांची स्थिती. | |
| 5 | नदी खोऱ्यातील पिक पध्दती:- | |
| 6 | नदीच्या जमिनीवरील अतिक्रमण :- | |
| 7 | प्रदूषण. | |
| 8 | नदी खोऱ्यातील जैवविविधता. | |
| 9 | पिण्याच्या पाण्याची समस्या आणी उपाययोजना..<br>(ग्रामपंचायत आरो प्लांट & खाजगी वाटर ए टी एम):- | |
| 10 | नदी खोऱ्यातील जलस्रोत. | |
| 11 | नदी यात्रे दरम्यान जोडलेली संस्था & व्यक्ती. | |
| 12 | नदी यात्रे दरम्यान लोकांशी संवाद साधताना मिळालेली माहिती, निरीक्षणे & सूचना. | |
| 13 | नदी खोऱ्यातील गावांची पूर & दुष्काळ या संदर्भातील ऐतिहासिक माहिती. | |
| 14 | नदीला अविरल निर्मल & बारमाही वहण्यासाठी तसेच गावाला जल समृध्द करण्यासाठी खालील पद्धती आवलंबल्या जात आहेत. | |
| 15 | 14. नदी खोऱ्यातील भूगर्भीय & भूजल मॅपिंग. | |
| | | |


S

# अहमदनगर जिल्ह्या विषयी माहिती..

महाराष्ट्रातील क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठा जिल्हा.

- अहमदनगर जिल्हा एकेकाळी निजामशाहीची राजधानी होती. येथे चांदबीबीचा महाल प्रसिद्ध आहे.
- 1942 च्या "चले जाव" आंदोलनात पं.नेहरू, वल्लभभाई पटेल,मौलाना आझाद व इतर महत्वाचे राष्ट्रीय नेते नगरच्या किल्ल्यात बंदिवासात होते पं.नेहरु नी येथेच "डिस्कव्हरी ऑफ इंडिया" ह ग्रंथ लिहिला.
- पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांनी स्थापन केलेला प्रवरा नगर येथील देशातील पहिला सहकारी साखर कारखाना येथेच स्थापन झाला.
- "कळसूबाई" हे महाराष्ट्रातील सर्वात उंच पर्वतशिखर अहमदनगर व नाशिक याच जिल्हाच्या सीमेवर आहे.
- अहमदनगर ची सीमा सर्वाधिक म्हणजे 7 जिल्ह्यांना लागलेली आहे.
- महाराष्ट्रातील सर्वाधिक सिंचनक्षेत्र असणारा जिल्हा अहमदनगर आहे.
- राहुरी – महात्मा फुले कृषी विद्यापीठ
- पुणतांबे – संत चांगदेव महाराजांची समाधी
- महाराष्ट्रात अहमदनगर जिल्ह्यात सर्वाधिक साखर कारखाने आहेत.
- अहमदनगर पासून 56 कि.मी अंतरावर प्रवरा नदीच्या काठी वसलेल्या नेवासे गावात "संत ज्ञानेश्वरांनी ग्रंथराज "ज्ञानेश्वरी" सांगितली.

- जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांचे राळेगण सिदधी गाव हे अहमदनगर जिल्ह्यात आहे. तसेच पोपटराव पवार यांचे हिवरे बाजार हे गाव देखील याच जिल्ह्यात आहे.

- अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरेकाठी वसलेले “दायमाबाद” हे स्थळ प्राचीन व ताम्रपाषाणयुगीन अवशेषांसाठी प्रसिद्ध आहे.

- महाराष्ट्रातील अष्ठाविनायकां पैकी “सिद्धिविनायक” सिद्धटेक हे अहमदनगर जिल्यात आहे .

- शिर्डी व साईबाबा मंदिर, शनिदेवाचे मंदिर , शनी शिंगणापूर तसेच मोहटा देवी, हि धार्मिक स्थाने याच जिल्यात आहे.

- भुईकोट किल्ला .

- देऊळगाव - रेहकुरी येथे काळवीट अभयारण्य (कर्जत तालुका)

- अहमदनगर व सोलापूरच्या सीमेवर नान्नज येथे माळढोक पक्षी अभयारण्य या जिल्ह्यात आहे.

- राष्ट्रीय महामार्ग क्र. 50, क्र. 222 आणि राज्य महामार्ग 10 या जिल्हयातुन गेले आहेत.

    - अहमदनगर जिल्हयात मोठया प्रमाणात साखर कारखाने असल्याने जिल्हयातला ऊस या साखरकारखान्यात पाठवला जातो.

    - राळेगण सिद्दी हे थोर समाजसेवक अण्णा हजारे यांचे आदर्श गाव याच जिल्ह्यात पारनेर तालुक्यात आहे. हे गाव पुणे शहरापासून 87 कि.मी अंतरावर आहे हे गाव जलसाक्षर सुद्धा झाले आहे. या गावात सौर उर्जेचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. सार्वजनिक ठिकाणी लागणारे दिवे हे सुद्धा सौर उर्जेवर लागतात. त्याचबरोबर या ठिकाणी बायोगॅस चा देखील वापर करतात.

    - कधीकाळी हिवरे बाजार हे आदर्श गाव भीषण दुष्काळाचा सामना करणारे गाव होते. आता हे गाव आदर्श गाव म्हणून ओळखल्या जाते. येथील पोपटराव पवार यांच्या अथक परिश्रमामुळे हे गाव समृध्द झाले आहे. आज या गावात सिंचन

प्रणाली, जलसाक्षरता, दारूबंदी, पारिवार नियोजन, श्रमदान करीता परिचित आहे.

- हिवरे बाजार या गावाला 11 सप्टेंबर 2007 “राष्ट्रीय जल पुरस्कार” प्राप्त झाला आहे.

- 1992 मध्ये अण्णा हजारे यांना दुसऱ्या गावांकरिता आपल्या गावाचा आदर्श ठेवल्यामुळे भारत सरकारने पद्मभूषण पुरस्काराने सम्मानित करण्यात आले.

**मुख्यालय** – अहमदनगर

**क्षेत्रफळ** – 17,048 चौ.कि.मी

**जनगणना** –**ए**कून लोकसंख्या – 45,43,083

- पुरुष व महिला प्रमाण – 1000 : 934

एकूण - साक्षरता – 80.22

**तालुके :-** एकूण 14

- अकोले,संगमनेर ,कोपरगाव ,श्रीरामपूर ,नेवासा ,पाथर्डी ,शेवगाव ,अहमदनगर ,राहुरी ,पारनेर ,कर्जत ,श्रीगोंदे ,जामखेड ,राहता.

**नद्या** – गोदावरी ,सीना , मुळा , प्रवरा , भीमा , ढोरा , घोड

**खनिजे -** बांधकामासाठी लागणारा दगड

**प्रमुख शेती उत्पादने -** तांदूळ ,ज्वारी, गहू,कापूस ,ऊस ,मका ,मोसंबी द्राक्षे , डाळींब.

**धरणे -** प्रवरा नदीवरील “विल्सन बंधारा (भंडारदरा)” , मुळा नदीवरील बारागाव नांदूर ही या जिल्ह्यातील मोठी धरणे आहेत.

**थंड हवेचे ठिकाण -** भंडारदरा

**सर्वात जास्त पाऊस पडणारे ठिकाण -** घाटघर

## नाशिक जिल्ह्या विषयी माहिती..

नाशिक हा जिल्हा समुद्र सपाटीपासून 565 मीटर उंचीवर आहे. महाराष्ट्राच्या उत्तर पश्चिम भागामध्ये स्थित आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने महाराष्ट्रातील नाशिक जिल्हा तिसऱ्या क्रमांकाचा आहे.येथील लोकसंख्या सुमारे 61 लाख इतकी आहे.15 हजार 582 चौरस किलोमीटर इतके क्षेत्रफळ आहे.उत्तरेला धुळे जिल्हा आहे तसेच पूर्वेस जळगाव जिल्हा आहे. दक्षिण पूर्व औरंगाबाद जिल्हा ,दक्षिणेकडे अहमदनगर जिल्हा आहे. नैऋत्येला ठाणे जिल्हा, पश्चिमेला गुजरात नवसारी जिल्हे आणि उत्तर पश्चिमेला एक जिल्हा आहे.नाशिक किंवा नासिक हे महाराष्ट्राच्या उत्तर भागातील एक महत्त्वाचे शहर मानले जाते. गोदावरी नदीच्या काठावरील हे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे.

नाशिक जिल्ह्याला महान पौराणिक पार्श्वभूमी आहे. भगवान राम आपल्या वनवासा दरम्यान पंचवटी येथे वास्तव्य करीत होते. त्याशिवाय अगस्ती ऋषी देखील तपश्चर्या साठी नाशिक मध्ये राहिले. महाराष्ट्राची गंगा म्हणजे गोदावरी नदी. या नदी नाशिक त्र्यंबकेश्वर येथून उगम पावते.त्रंबकेश्वर मंदिर त्रिंबक या गावी स्थित आहे. ते बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे.

त्र्यंबकेश्वर येथे हिंदू वंशावळीची नोंदणी केली जाते.नाशिकला अनेक प्रसिद्ध व्यक्ती असल्याचे श्रेय मिळाले आहे. वीर सावरकर ,अनंत कान्हेरे ,दादासाहेब पोतनीस ,बाबुभाई राठी, वि. वा. शिरवाडकर आणि वसंत कानेटकर ही फक्त काही नावे आहेत.

# नाशिक जिल्ह्याची वैशिष्ट्ये

- महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक शहरात आहे.
- नाशिक येथे महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी आहे.

- भारत सरकारद्वारा संचालित भारत सिक्युरिटी प्रेस नाशिक येथे असून, येथे चलनी नोटा व टपाल तिकिटे, इंदिरा विकास पत्रे, किसान विकास पत्रे, पोस्टल ऑर्डर्स, पासपोर्ट व टपाल तिकीट आदींची छपाई केली जाते.
- पोलीस उप अधीक्षक व पोलीस उपनिरीक्षक आदी अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणारी महाराष्ट्र पोलीस ॲकॅडमी येथे आहे.
- देवळाली येथे भारतीय लष्कराचा तोफखाना विभागाची छावणी आहे.
- नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे भारतातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक ज्योतिर्लिंग आहे.
- मालेगाव येथील साड्या, येवला येथील शालू, पैठण्या व पितांबर आहे.  यासाठी हे ठिकाण प्रसिद्ध आहे.
- देवीच्या साडेतीन पीठांपैकी सप्तश्रृंगी देवी याच जिल्ह्यात आहे
- गोदावरी व कादवा या नद्यांच्या संगमाजवळ वसलेले व 'महाराष्ट्राचे भरतपूर' म्हणून ओळखले जाणारे नांदूर-मध्यमेश्वर नाशिक जिल्ह्यात आहे.
- भारतात सनदशीर राजकारणाचा पाया घालणारे न्यायमूर्ती रानडे यांचा जन्म याच जिल्ह्यातील निफाडचा होय.
- भारतीय चित्रपटाचे जनक दादासाहेब फाळके यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील होय.
- नाशिक जिल्ह्यातील निफाड व लासलगाव ही ठिकाणे कांदा व लसूण यांच्या उत्पादनाकरिता प्रसिद्ध आहेत.

# (अ)  भौगोलिक माहिती

१. क्षेत्रफळ=१५,५८२ चौ. किमी

२. जंगलाचे प्रमाण=७.०१%

३. अभयारण्ये=नांदूर-मधमेश्वर

४. वनोद्याने=गंगापूर व सप्तश्रृंगी

# (आ)  प्रशासकीय माहिती

१. आयुक्तालय=नाशिक विभाग

२. जिल्ह्याचे मुख्यालय=नाशिक

३. उपविभाग =०९

नाशिक,मालेगाव, येवला ,कळवण, दिंडोरी, चांदवड,निफाड, बागलाण, ईगतपुरी

४. तालुके=१५

नाशिक, बागलाण(सटाणा), पेठ, मालेगाव, सुरगाणा, सिन्नर, कळवण,

देवळाली. दिंडोरी, चांदवड, नांदगाव, निफाड, येवले, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर.

५. पंचायत समित्या=१५

६. ग्रामपंचायत =१३८१

७. महानगरपालिका= ०२ नाशिक व मालेगाव

८. नगरपालिका =०९

९. नगरपंचायत =०६

१०.कटक मंडळ =०१ देवळाली

११. पोलीस मुख्यालय=०२ शहर पोलीस आयुक्त ग्रामीण पोलीस अधीक्षक

१२. पोलीस स्टेशनची संख्या= शहर पोलीस आयुक्तालय(८) ग्रामीण पोलीस अधीक्षक (३६)

## (इ) लोकसंख्या (सन २०११ च्या जनगणनेनुसार)

१. लोकसंख्या =६१,०७,१८७

२. साक्षरता =८२.३१%

३. लिंग गुणोत्तर =९३१

४. लोकसंख्येची घनता =३९३

# चला जणुया नदीला या अभियाना विषयी थोडक्यात माहिती..

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून 75 वर्ष पूर्ण झाल्याने संपूर्ण देशभरामध्ये "**स्वतंत्र्याच्या अमृत महोत्सव"** हा उत्सव वेगवेगळे उपक्रम साजरे करून मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरा केला जात होता. या काळात तात्कालीन वन व सांस्कृतिक कार्यमंत्री मा.श्री. सुधीर मुनगंटीवार आणि जागतिक जलतज्ञ जलपुरुष डॉ.राजेंद्रसिंहजी यांची भेट झाली. चर्चा करत असताना जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंहजी यांनी एक मुद्दा मांडला तो म्हणजे, आपण संपूर्ण देशभरात त्याच प्रमाणे आपल्या महाराष्ट्रातही **स्वतंत्र्याचा अमृत महोत्सव** साजरा करीत आहोत. 1947 सली जेंव्हा देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा मात्र **आपल्या नद्या अमृतवाहिनी** होत्या. त्या शुध्द, अविरल आणि निर्मळ वाहत होत्या. म्हणजेच आपल्या नद्यांमधून अमृत वाहत होते. **आता आपल्या नद्या अमृतवाहिनी राहिल्या आहेत का?** का त्या विषवाहिनी झाल्या आहेत. आपल्या नद्यांमध्ये जर अमृत वाहत नसेल तर आपण अमृत महोत्सवी वर्ष कसे साजरे करू शकतो.

डॉ.राजेंद्रसिंहजी पुढे बोलताना म्हणाले आपल्या देशातील 99% **नद्यांचा उगम हा वन जमिनीतून** होतो. त्यामुळे वन विभागाने पुढाकार घेऊन नद्यांची सद्य परिस्थिती जाणून घेण्यासाठी अभ्यास दौरा करून नदिला शुध्द, अविरल आणी निर्मळ (अमृतवाहिनी) म्हणजेच महाराष्ट्राला पुर आणि दुष्काळ मुक्त बनवण्यासाठी काय करणे गरजेचे आहे या संदर्भात कृत आराखडा तयार करण्याच्या दृष्टहीने नद्यांची यात्रा करणे अत्यंत गरजेचे आहे.

या नदी यात्रेला (अभ्यास दौऱ्याला) **"चला जाणुया नदीला"** असे नाव देण्यात आले. महाराष्ट्र शासनाने 30 सप्टेंबर 2022 रोजी 'शासन निर्णय' निर्गमित केला या शासन निर्णयाद्वारे मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली तर प्रधान सचिव वने यांच्या कार्याध्यक्षते खाली 'चला जाणुया नदीला' या अभियानाची एक राज्यस्तरीय समितीची गठित केली. या समितीत मध्ये शासनाचे वेगवेगळ्या विभागाचे प्रधान सचिव आणि जल बिरादरीच्या व्यक्तींची अशासकीय सदस्य म्हणून आशा एकूण 30 सदस्यांची निवड करण्यात आली.

1.महाराष्ट्राला वारंवार भेडसावणाऱ्या पूर आणि दुष्काळ या समस्या पासून मुक्तीसाठी नदी संवाद अभियानाचे आयोजन करणे.

2. अभियानांतर्गत जनसामान्यांना नदी साक्षर करण्याबाबत उपाययोजना आखणे व अंमलबजावणीसाठी यंत्रणा निश्चित करणे.

3.नदी ला अमृतवाहिनी बनवण्यासाठी मसुदा तयार करणे.

4. नदीचे स्वास्थ्य आणि मानवी आरोग्य याबाबत प्रचार व प्रसार रूपरेषा आखणे.

5. नदीचा तट,  प्रवाह, जैवविविधतेबाबत प्रत्येक जिल्ह्यात प्रचार व प्रसार या बाबत नियोजन करणे.

6. नदीच्या पाणलोट क्षेत्राचा अभ्यास करून त्यावर संबंधितांना कार्यवाही अहवाल सादर करणे.

7. पावसाचे पाणी योग्य जागी अडवून भूजल स्तर उंचावणे, जनजागृती करण्याबाबत आकृतीबंध तयार करणे.

8. अतिक्रमण, शोषण आणि प्रदूषण या तीन प्रमुख कारणांचा अभ्यास आणि त्याचा नदी आणि मानवी जीवनावर होणारा परिणाम अभ्यासणे व त्याचा प्रचार व प्रसार करणे बाबत आखणी करणे.

9. महाराष्ट्रातील सुमारे 75 नदी खोऱ्यातून नदी संवाद यात्रा आयोजित करण्याबाबत आराखडा तयार करून अंमलबजावणी करणे.

10 शासन, समाज आणि नदीवर काम करणाऱ्या संस्थे  मध्ये सुसुत्रता आणण्यासाठी प्रयत्न करणे.

11.  स्थानिक स्वराज्य संस्था  (ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपालिका आणि महानगरपालिका)  यांचे जल व्यवस्थापन अभ्यासणे, त्यातील उणीवा आणि उत्कृष्ट उदाहरणे अभ्यासणे,  त्याचे निराकरण करण्यास लोकसंवाद घडविणे.

12. नदी, समाज आणि शासन यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करणे.

**आशा एकूण  12 गोष्टींचे ध्येय आणि उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून “चला जाणुया नदीला” या राज्य स्तरीय समितीची स्थापना करण्यात आली.** या अनुषंगाने 02 ऑक्टोंबर 2022 रोजी महात्मा गांधी यांच्या जयंती दिनी वर्धा जिल्ह्यातील महात्मा गांधी यांच्या सेवाग्राम आश्रमातून महाराष्ट्राचे तात्कालीन उपमुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस,  तात्कालीन वने व सांस्कृतिक कार्यमंत्री मा.श्री.  सुधीर  (भाऊ) मुनगंटीवार आणि जलपुरुष डॉ.  राजेंद्रसिंहजी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये “चला जाणुया नदीला” या अभियानाची सुरुवात करण्यात आली.  या अभियाना अंतर्गत गेल्या 2 ते 3 दशकांपासून नदीवर स्वयंप्रेरणेने काम करणाऱ्या नदी प्रहरी यांची तीन दिवसीय कार्यशाळा जलपुरुष डॉ.  राजेंद्रसिंहजी यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली.

चला जाणूया नदीला या अभियानाच्या अंतर्गत महाराष्ट्रातील 75 नद्या निवडून त्यावर यात्रा करून महाराष्ट्राला पुर व दुष्काळ मुक्त कण्याच्या उद्देशाने नद्या अमृतवाहिनी (शुध्द, अविरल आणि निर्मळ) बनवण्यासाठी त्यांचा **“सद्य परिस्थिती अहवाल”** आणि **“कृती आराखडा”** करण्याचे निश्चित करण्यात आले. परंतु महाराष्ट्रातील गोदावरी खोरे, कृष्णा खोरे, तापी खोरे, नर्मदा खोरे आणि पश्चिम वाहिनी वाहणाऱ्या नद्या आशा 5 प्रमुख नदी खोऱ्यातुन एकूण 108 नद्यांची निवड "चला जाणूया नदीला" अभियानात करुन या 108 नदीची यात्रा सुरू झाली.

या 108 नद्यांची सुची आणि वरील ठरल्याप्रमाणे 12 उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून प्रत्यक्ष कार्य करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 14 ऑक्टोंबर 2022 रोजी एक शासन निर्णय निर्गमित करून एक जिल्हा स्तरावर “चला जाणुया नदीला” या अभियानाची जिल्हा स्तरीय समिती गठीत केली. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या सह अध्यक्षतेखाली शासनाचे वेगवेगळे 27 विभाग व प्रत्येक नदीवर 2 अशासकीय सदस्य अशी या समितीची रचना करण्यात आली. या समिती अंतर्गत वरील 12 कार्य उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून प्रत्यक्ष नदी यात्रा करण्याचे निश्चित करण्यात आले. या अभियानाला बळकट करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 30 सप्टेंबर 2022, 14 ऑक्टोंबर 2022, 29 नोव्हेंबर 2022 आणि 20 जानेवारी 2023 आसे एकुण 4 शासन निर्णय निर्गमित केले आहेत.

वरील 108 नद्यांमध्ये **गोदावरी खोऱ्यातील प्रामुख्याने प्रवरा नदीची उपनदी म्हाळुंगी या नदीचा समावेश या “चला जाणुया नदीला” अभियानात** करण्यात आलेला आहे.



19th Sept 2022



Civil Society Members represented by JalBiradari and Maharashtra Government Together Resolve to make the state flood and drought proof and work for making our River's *Amrit Vahini's, Aviral Nirmal*

.Chala Jaanuya Nadila Training Prog
2nd Oct 2022
Seva Gram Wardha







Chala Januya Nadila,
Nadi Yatra Shubharambh.
at Seva Gram Wardha. 2nd Oct 2022



**Meeting between Dr. Rajendra Singh ji, JalBiradari team and Civil Society Members with Chief secretary of Maharashtra state Shri. ManuKumar Srivastava. ( 7th Oct 2022)**

Chief Secretary expressed State Gov't resolve to work with the civil society for making the River's *Amrit Vahini's*



2 आक्टोबर 2022 रोजी वर्धा येथे सेवाग्राम आश्रमात **चला जाणूया नदीला** या अभियानाच्या शुभारंभ प्रसंगी **डॉ. राजेंद्रसिंह ( बाबूजी )** यांचे समवेत.





# म्हाळुंगी नदी अहवाल

## म्हाळुंगी नदीचा परिचय :-

* म्हाळुंगी नदी ही प्रवरा नदीची उपनदी आहे.

* म्हाळुंगी नदीचा उगम अहमदनगर जिल्ह्यातील आकोले तालुक्यातील तिरढे या गावातील पट्टा किल्ला या ठिकाणा पासून होतो.

( GPS : LAT :19.7031N Long:73.8395E)

* म्हाळुंगी नदीचा संगम अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर येथे प्रवरा नदिस होतो.

(GPS : Lat : 19.558821N Long: 74.210412E)

* म्हाळुंगी नदीची लांबी 51 किमी. आहे.

* म्हाळुंगी नदीचे खोरे महाराष्ट्रातील नाशिक व अहमदनगर या दोन जिल्ह्यात आहे.

नाशिक - सिन्नर तालुका, अहमदनगर - आकोले तालुका आणि संगमनेर तालुका.

या तीन तालुक्यातील १०७ गांवे म्हाळुंगी नदीखोऱ्यात आहेत.

* म्हाळुंगी नदीचे खोरे हे गोदावरी वाटरशेड 101 या (GV101) पानलोटक्षेत्र आहेत.

* म्हानूटी नदी ही म्हाळुंगी नदीची उप नदी आहे.

* म्हाळुंगी नदीचा एकुण एरिया (क्षेत्रफळ)

## अ.  म्हाळुंगी नदीचा इतिहास:-

म्हाळुंगी नदी ही प्रवरा नदीची उपनदी असून तिचा उगम अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील पट्टाकिल्ला ( विश्रामगड ) च्या पायथ्याशी पट्टेवाडी या तिरढे गावच्या वाडीत झालेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज जालन्याची लूट करून परतत असताना संगमनेर जवळ मोगल सेनापती रणमस्तखान याने त्यांना रोखले, त्यावेळी बहिरजी नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज लूटीसह पट्टाकिल्ल्यावर आश्रयास गेले, तेथे त्यांनी 10 – 12 दिवस विश्रांती घेतली म्हणून या किल्ल्यास विश्रामगड हे नाव पडले.

. रणमस्तखानाशी तिन दिवस सरदार शिदोजी निंबाळकरांनी सामना केला, अखेरीस ते घायाळ झाले. व धारातिर्थी पडले. त्यांची समाधी म्हाळुंगी नदीच्या उगमस्थानाजवळ आहे. सध्या समाधीस्थळाची फारच दुरावस्था झाली <u>असून तिचा जिर्णोद्धार होणे गरजेचे आहे.</u>






म्हाळुंगी नदिचे उगमस्थान



शिदोजी निंबाळकर यांचे समाधीस्थान

## ब. नदी काठाची गावे:-

### नाशिक जिल्हा-

**सिन्नर तालुका -** ठाणगाव, पाडळी,आशापूर, हिवरे, पिंपळे,सोनेवाडी ( भोजापूर ), चास, कासारवाडी, नळवाडी.

### अहमदनगर जिल्हा-

**आकोले तालुका -** तिरढे, म्हाळुंगी .

**संगमनेर तालुका -** चिकणी, निमगाव- भोजापुर, वेल्हाळे, राजापूर, गुंजाळवाडी, संगमनेर.

## ब. नदी खोऱ्यातील गावे :-

## 2. म्हाळुंगी नदी संवाद यात्रा.



# आढळा - म्हाळुंगी नदी संवाद यात्रा



हवामान बदलाच्या दुष्परिणामाची सर्वाधिक झळ शेतकऱ्यांना बसते. त्यात भर हवा, पाणी आणि मृदांचे स्वास्थ बिघडले आहे. वाढते नागरीकरण, नियम भंग करुन वाढलेले उद्योगधंदे आणि रासायनिक खतांचा आणि किटकनाशकांचा बेसुमार वापर यामुळे अनेक संकटांना आपणच आमंत्रण दिले आहे. लोकमाता नद्याही त्यातून सुटल्या नाहीत. अमृतवाहिनी नद्यांची आपणच गटारे बनवली. महाराष्ट्र शासनाने जलबिरादरी या पाण्यावर काम करणाऱ्या संस्थेच्या सहकार्याने **चला जाणूया नदीला** या उपक्रमा अंतर्गत नदी संवाद यात्रेचे आयोजन केले आहे.

उपक्रमाचे उद्देश :

- नदीचा सर्वांगीण अभ्यास करणे.
- नदीचे स्वास्थ समजून घेऊन त्यावरील उपाय योजना आराखडा बनविणे.
- नदीची जैवविविधता जपणे व तिचे संवर्धन करणे.
- नदीकाठच्या गावांच्या सांडपाणी व कचऱ्याचे तंत्रशुद्ध व्यवस्थापन करणे.
- नदी बारमाही आणि अमृतवाहिनी बनविणे.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून २ ऑक्टोबर २०२२ रोजी सेवाग्राम येथून या उपक्रमाची सुरुवात झाली. सुरुवातीस निवडलेल्या ७५ उपनद्यामध्ये आपल्या आढळा आणि म्हाळुंगी या उपनद्यांचा यात समावेश असून अहमदनगर जिल्ह्याच्या नदीसंवाद यात्रेचे अध्यक्ष मा.जिल्हाधिकारी, सचिव, उपवनसंरक्षक मा.सुवर्णा माने आणि समन्वयक विठ्ठल शेवाळे आणि सुभाष देशमुख आहेत.

-: अधिक माहितीसाठी पहा :-

शासन निर्णय: पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. संकीर्ण ८२२२/प्र.क्र.२७६/सां.का.४, दि. ३० सप्टेंबर २०२२

जलबिरादरी

**पुढारी**

**संक्षिप्त**



सिन्नर : उपविभागीय अधिकारी अर्चना पठारे यांना निवेदन देताना संपतराव देशमुख, डॉ. दशरथ रुपवते आदी.

### 'चला जाणू या नदीला' अभियान बैठक

सिन्नर : 'चला जाणू या नदीला' अभियानांतर्गत उपविभागीय अधिकारी अर्चना पठारे यांच्या अध्यक्षतेखाली तहसील कार्यालय येथे बैठक पार पडली. बैठकीस तहसीलदार एकनाथ बंगाळे, गटविकास अधिकारी मधुकर मुरकुटे, म्हाळुंगी नदी समन्वयक संपतराव देशमुख, जिल्हा समन्वयक डॉ. दशरथ रुपवते अशासकीय सदस्य तसेच वनखाते, महसूलसह इतर यंत्रणांचे प्रतिनिधी उपस्थित होते. संपतराव देशमुख यांनी वेगवेगळ्या यंत्रणांकडून आवश्यक असणाऱ्या माहितीचे निवेदन उपविभागीय अधिकारी पठारे यांना सुपूर्द केले. पठारे यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन संबंधित सर्व यंत्रणांना या अभियानास सहकार्य करण्याचे आवाहन केले. येत्या १५ दिवसात सर्व यंत्रणांनी आपापली माहिती तयार करावी अशा सूचना देऊन पुन्हा १५ दिवसांनी बैठक घेण्याचे तसेच सर्व संबंधितांचा एक व्हॉट्स ॲप ग्रुप तयार करण्याच्या सूचना वनाधिकाऱ्यांना दिली.

# म्हाळुंगी नदी संवाद यात्रेचा शुभारंभ कलश पूजन 15-10-2022 संगमनेर.




मा. उपविभागीय अधिकारी, संगमनेर यांचे समवेत.



चला जाणूया नदीला अभियान, **म्हाळुंगी नदी संवाद यात्रा नियोजन बैठक,**

**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक.**




**उपविभागीय अधिकारी कार्यालय, सिन्नर.**



## मा. अर्चना पठारे ( प्रांत मॅडम ) यांचे शुभहस्ते म्हाळुंगी नदी संवाद यात्रेचा शुभारंभ नळवाडी ता. सिन्नर.









# 3. प्रसार माध्यमांद्वारे म्हाळुंगी नदीची जनजागृती.



पुढारी

# ‘चला जाणू या नदीला’ अभियान यशस्वी करा

जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

नदी साक्षर व्हावे : पुलकुंडवार

सहभागी व्हा

Nashik Edition
Nov 1, 2022 Page No. 2



गांवकरी

# चला जाणुया नदीला अभियान लोकसहभागातून यशस्वी करा

अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी



# जिल्ह्यात सुरू होणार नदी संवाद यात्रा

## सोनेवाडी येथे प्रभात फेरीव्दारे जनजागृती -






## 3. नकाशे :-


### १. अहमदनगर जिल्हा नकाशा





### 2. म्हाळुंगी नदी  उगम ते संगम दर्शवणारा नकाशा:-

## ३. पाणलोट क्षेत्र नकाशे:-







**4. म्हाळुंगी  नदी उगम व संगम दर्शवणारा गूगल नकाशा.**




# ५. म्हाळुंगी  नदी खोऱ्यातील तालुकाचे नकाशा:-


## अकोले  तालुका नकाशा





## सिन्नर  तालुका नकाशा



## संगमनेर  तालुका नकाशा




## ६. नदी पात्र दर्शक नकाशा:-



## ७. नदीचे टोपोशीट:



## ३. नदी खोऱ्यातील वनक्षेत्र आणि त्यांची स्थिती:-

अहमदनगर जिल्ह्यातील एकुण वन जमीन **1904.88 चौ.की.मी.**

एकुण क्षेत्रफळाशी वन जमीनीची टक्केवारी **11.17%**

**नदी खो-यातील गाववार वनक्षेत्र खालील प्रमाणे आहे.**

### अ) नाशिक जिल्हा

1 ठाणगाव – 940 .00 हेक्टर

2 पाडळी - 25 . 00 हेक्टर

3 आशापूर - 11 . 09 हेक्टर

4 हिवरे –

5 पिंपळे –

6 सोनेवाडी - 877.83 हेक्टर

7 चास - 870 . 44 हेक्टर

8 कासारवाडी -

9 नळवाडी – 731 . 12 हेक्टर

## ब) अहमदनगर जिल्हा

1 तिरढे -

2 म्हाळुंगी -

3 चिकणी - 305.56 हेक्टर

4 निमगाव भोजापूर - 19 . 00 हेक्टर

5 वेल्हाळे – 278 . 00 हेक्टर

6 राजापूर -

7 गुंजाळवाडी -

8 संगमनेर -

## 4. नदी खोऱ्यातील पिक पध्दती:-

म्हाळुंगी नदीचे खोरे महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर, आकोले व नाशिक जिल्ह्यातील सिन्नर या तीन तालुक्यामध्ये आहे. या भागातील लोकांची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवर चालते.

नदी खोऱ्यातील मुख्य पिके खालीलप्रमाणे आहेत.

**खरीप हंगाम:** बाजरी, भुईमूग, मठ, सोयाबीन, आणि मूग

**रब्बी हंगाम:** ज्वारी, गहू आणि हरभरा

**प्रमुख नगदी पीक:** ऊस, कोबी, भाजीपाला,

**म्हाळुंगी नदी खोऱ्यात तीन मुख्य पीक हंगाम आहेत..**

खरीप : पावसाळ्यात पेरणी केली जाते. ( 1 जूलै ते 14 आक्टोबर )

रब्बी : थंडीची सुरुवात होते. ( 15 आक्टोबर ते 28 फेब्रुवारी )

उन्हाळी : रब्बी आणि खरीप दरम्यान लहान पीक हंगाम. ( 1 मार्च ते 30 जून )

## 5. नदीच्या जमिनीवरील अतिक्रमण :-

म्हाळुंगी नदीच्या प्रत्यक्ष यात्रे दरम्यान म्हाळुंगी नदीचे पात्र हे अतिक्रमणाच्या विळख्यात अडकल्याचे दिसून आले. म्हाळुंगी नदी पात्रात प्रमुख **चार** प्रकारचे अतिक्रमन दिसून आले.

1. विहिरींचे अतिक्रमण:-
2. शेतीचे अतिक्रमण:-
3. बांधकामाचे अतिक्रमण:-
4. वेडी बाभूळ:-

### 1. विहिरींचे अतिक्रमण:-

नदीच्या काठावर असणाऱ्या शेतकऱ्यांनी नदीपात्रात विहीर घेऊन त्या विहिरीला सिमेंट काँक्रीटचे कडे तयार केले असून त्या विहिरीतून निघालेला सर्व दगड, गाळ, माती हा राडाराडा नदीच्या पात्रातच टाकलेला आहे. त्यामुळे नदीची वाहन क्षमता खूपच कमी झाल्याचे दिसून आले. नदीपात्रात जवळपास बराच भाग विहरींच्या अतिक्रमणाच्या विळख्यात अडकलेला आहे. आजूबाजूच्या व गावातील शेतकऱ्यांसोबत चर्चा केली असता लोकांनी शेतकऱ्यांनी नदीच्या काठावर किंवा पात्रामध्ये विहिरी घेतल्या असेल तर विहिरी असू द्याव्यात परंतु विहिरीतून निघालेला गाळ, माती, कचरा इत्यादी राडाराडा शेतकऱ्याने तात्काळ बाजूला करावा आसे मत मांडले.

फोटो

## 3 शेतीचे अतिक्रमण:-

म्हाळुंगी  नदीची यात्रा करत असताना प्रामुख्याने नदीपात्रात शेत जमिनीचे अतिक्रमण झाल्याचे आढळले. कारण काय तर ही नदी बारमाही वाहत नसल्याने ज्यावेळेस नदीपात्रात पाणी नसते त्यावेळेस शेतकरी आपला बांध नदीपात्रात सरकवतात आणि डायरेक्ट पीक नदीपात्रात घेतले जाते. त्यामुळे शेतकऱ्याचा वैयक्तिक फायदा होतो  आहे. परंतु नदीची  पाणी वाहन क्षमता व पाणी साठवण  क्षमता कमी झाल्याचे दिसून आले.

फोटो

### 3 बांधकामांचे अतिक्रमण:-

नदीच्या काठावर असणाऱ्या प्रत्येक गावातील स्मशानभूमी नदीपात्रात असल्याचे आढळले. स्मशानभूमी नदीपात्रात आहेच सोबतच लोकांना तेथे उभे राहता यावे यासाठी नदीपात्रांमध्ये भराव टाकून काही ठिकाणी काँक्रीट तर काही ठिकाणी पेविंग ब्लॉक बसवल्याचे दिसून आले. काही गावात नदीच्या पात्रामध्ये मंदिर व सार्वजनिक शौचालय असल्याचेही दिसून आले. तसेच नदीवर बांधलेले पूल यांची रुंदी नदीच्या रुंदी पेक्षा कमी ठेवल्याने नदी प्रवहास अडथळा निर्माण झाला आहे.

संगमनेर सारख्या तालुक्याच्या ठिकाणी नदीपात्रातच समाजातील भटक्या जमातींनी आपली घरे व जनावरांचे गोठे बांधून अतिक्रमण केलेले आहे.

फोटो

## 5 प्रदुषण:-

या ठिकाणाहून गावातील सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता म्हाळुंगी नदीपात्रात जाते आणि नदीतील स्वच्छ पाण्याला दुषित करते.

| अ.क्र. | गावाचे नाव | सांडपाणी आणनारा नाला मिळण्याचे ठीकाण. | अक्षांश | रेखांश |
|---|---|---|---|---|
| 1 | | आकोले तालुका | | |
| 1. | तिरढे | वस्ती विरळ असल्याने सांडपाणी जमिनीतर मुरते. | | |
| 2. | म्हाळुंगी | वस्ती विरळ असल्याने सांडपाणी जमिनीतर मुरते | | |
| 2 | | सिन्नर तालुका | | |
| 1 | ठाणगाव | संपूर्ण गावचे सांडपाणी म्हाळुंगी नदीतच येते. | | |
| 2 | पाडळी | . संपूर्ण गावचे सांडपाणी म्हाळुंगी नदीतच येते. | | |
| 3 | आशापूर | गावचे सांडपाणीजवळच्या नाल्यातून म्हाळुंगी नदीत येते. | | |
| 4 | हिवरे | संपूर्ण गावचे सांडपाणी म्हाळुंगी नदीतच येते. | | |
| 5 | पिंपळे | संपूर्ण गावचे सांडपाणी म्हाळुंगी नदीतच येते. | | |
| 6 | भोजापूर ( सोलेवाडी ) | संपूर्ण गावचे सांडपाणी म्हाळुंगी नदीतच येते. | | |
| 7 | चास | संपूर्ण गावचे सांडपाणी म्हाळुंगी नदीतच येते. | | |
| 8 | कासारवाडी | संपूर्ण गावचे सांडपाणी म्हाळुंगी नदीतच येते. | | |
| 9 | नळवाडी | संपूर्ण गावचे सांडपाणी म्हाळुंगी नदीतच येते. | | |
| 3 | | संगमनेर तालुका | | |
| 1 | चिकणी | संपूर्ण गावचे सांडपाणी म्हाळुंगी नदीतच येते. | | |
| 2 | निमगाव - भोजापुर | संपूर्ण गावचे सांडपाणी म्हाळुंगी नदीतच येते. | | |
| 3 | वेल्हाळे | संपूर्ण गावचे सांडपाणी म्हाळुंगी नदीतच येते. | | |
| 4 | राजापूर | संपूर्ण गावचे सांडपाणी म्हाळुंगी नदीतच येते. | | |
| 5 | गुजांळवाडी | शहरा लगतच्या भागातील सांडपाणी बंदिस्त गटारींव्दारे म्हानूटी नदीत येते. | | |
| 6 | संगमनेर | दूध संघ, अभियांत्रीकी महाविद्यालय, साखर कारखाना, घुलेवाडी, संगमनेर शहराचा पच्छीम भाग यांचे सांडपाणी म्हानूटी नदीतून म्हाळुंगी नदीत व पुढे प्रवरा नदीत जाते. | | |

# म्हानूटी नदी वरील सांडपाण्याचे फोटो –







Latitude: 19.598449
Longitude: 74.190775
Elevation: 597.69±14 m
Accuracy: 2300.0 m
Time: 11-28-2022 15:27
Note: घुलेवाडी कडून येणारी नाली
Powered by NoteCam


Latitude: 19.59366
Longitude: 74.195737
Altitude: 530.1±14 m
Accuracy: 1800.0 m
Time: 11-28-2022 15:25
Note: घुलेवाडी कडून येणारी नाली
Powered by NoteCam


Latitude: 19.611373
Longitude: 74.184134
Altitude: 529.4±12 m
Accuracy: 144.9 m
Time: 11-28-2022 15:05
Note: इंजिनिअरींग कॉलेज कडून येणारी नाली
Powered by NoteCam


Latitude: 19.611377
Longitude: 74.184135
Elevation: 596.93±15 m
Accuracy: 87.6 m
Time: 11-28-2022 15:04
Note: इंजिनिअरींग कॉलेज कडून येणारी नाली
Powered by NoteCam


Latitude: 19.61738
Longitude: 74.179344
Accuracy: 2600.0 m
Time: 11-28-2022 14:46
Note: MIDC कडून येणारी नाली
Powered by NoteCam


Latitude: 19.604439
Longitude: 74.182895
Accuracy: 2400.0 m
Time: 11-28-2022 14:58
Note: दुध संघा कडून येणारी नाली
Powered by NoteCam


Latitude: 19.586102
Longitude: 74.188032
Accuracy: 2600.0 m
Time: 11-28-2022 14:33
Note: दूध संघाकडून येणारी नाली
Powered by NoteCam


Latitude: 19.591919
Longitude: 74.184363
Elevation: 561.0±23 m
Accuracy: 2100.0 m
Time: 11-25-2022 16:48
Note: संगमनेर घलेवाडी बायपास
Powered by NoteCam


Latitude: 19.591919
Longitude: 74.184363
Altitude: 493.4±23 m
Accuracy: 2100.0 m
Time: 11-25-2022 16:47
Note: संगमनेर घलेवाडी बायपास
Powered by NoteCam


Latitude: 19.591919
Longitude: 74.184363
Altitude: 493.4±23 m
Accuracy: 2100.0 m
Time: 11-25-2022 16:46
Note: संगमनेर घलेवाडी बायपास
Powered by NoteCam


Latitude: 19.591919
Longitude: 74.184363
Elevation: 561.0±23 m
Accuracy: 2100.0 m
Time: 11-25-2022 16:43
Note: संगमनेर घलेवाडी रोड जवळ
Powered by NoteCam



Latitude: 19.586102
Longitude: 74.188032
Elevation: 561.0±23 m
Accuracy: 2600.0 m
Time: 11-25-2022 16:41
Note: संगमनेर घलेवाडी रोड जवळ
Powered by NoteCam


Latitude: 19.57777
Longitude: 74.197119
Altitude: 493.4±23 m
Accuracy: 138.1 m
Time: 11-25-2022 16:33
Note: संगमनेर रहाणे मळा जवळ
Powered by NoteCam


Time: 11-25-2022 16:32
Note: संगमनेर बी एड कॉलेज जवळ


Latitude: 19.575804
Longitude: 74.198655
Elevation: 558.35±6 m
Accuracy: 54.9 m
Time: 11-25-2022 16:29
Note: संगमनेर बी एड कॉलेज जवळ
Powered by NoteCam


Latitude: 19.575191
Longitude: 74.19537
Elevation: 557.56±10 m
Accuracy: 2200.0 m
Time: 11-25-2022 16:23
Note: संगमनेर गुंजाळ वाडी रोड जवळ
Powered by NoteCam


Latitude: 19.573307
Longitude: 74.199043
Elevation: 557.56±10 m
Accuracy: 141.0 m
Time: 11-25-2022 16:20
Note: संगमनेर बी एड कॉलेज जवळ
Powered by NoteCam


Latitude: 19.573711
Longitude: 74.199039
Elevation: 560.36±21 m
Accuracy: 300.0 m
Time: 11-25-2022 16:20
Note: संगमनेर बी एड कॉलेज जवळ
Powered by NoteCam


Latitude: 19.573382
Longitude: 74.203442
Accuracy: 1100.0 m
Time: 11-25-2022 16:15
Note: संगमनेर बी एड कॉलेज जवळ
Powered by NoteCam


Latitude: 19.569429
Longitude: 74.201638
Accuracy: 1700.0 m
Time: 09-28-2022 14:37
Note: Mhanuti -Mahalungi Ssngam
Powered by NoteCam


Latitude: 19.558821
Longitude: 74.210412
Accuracy: 1800.0 m
Time: 09-28-2022 14:45
Note: Pravara-Mahalungi Ssngam
Powered by NoteCam

## 7. नदी खो़ऱ्यातील जैवविविधता :-

**हि जैवविविधता कुळांनुसार विभागली जाते-**

**1) मासे:-**

**2) उभयचर:-** 11 प्रजातींचे उभयचर म्हणजे बेडूक प्रजाती येथे आढळून येतात.

**3) सरपटणारे प्राणी:-** या मध्ये सर्प प्रजाती जसे नाग, घोणस, मण्यार, फुरसे, धामण, कवड्या, रुका सर्प, नानेटी, पानदिवड , कासव यांचा वावर दिसून आला आहे.

**4) पक्षी:-** म्हाळुंगी नदी खो़ऱ्यातील स्थानिक आणि स्थलांतरीत अश्या विविध पक्ष्यांच्या 190 पेक्षा जास्त प्रजाती आढळून येतात. या मध्ये ब्राम्हणी घार, छोटा बगळा, बुलबुल, मोर यांसारख्या सामान्य पक्षी प्रजातींनसोबत तुतवार, हिरवी तुतारी, धाविक, वन घुबड, जांभळा बगळा, निलपरी, निळा माशिमार, रंगीत पानलावा, तीरचिमनी, अशा दुर्मिळ आणि काही स्थलांतरित पक्षी प्रजाती आढळून येतात. कवठेमहांकाळ तालुक्यातील नंगोळे गावात 4 वर्ष माळढोक पक्षी वास्तवास होता.

**5) सस्तन प्राणी:-**सस्तन प्राण्यांच्या एकूण 23 प्रजाती आढळून येतात. या मध्ये दुर्मिळ असलेल्या भारतीय लांडगा, खोकड, खवल्या मांजर, 5 पाट्यांची खार, मांज्याट यांसारख्या वन्य प्राण्या सोबत शेळया, मेंढ्या, म्हशी, गायी, यांच्या काही प्रजाती आढळून येतात.

कीटक, भुंगे, फुलपाखरे, मुंग्या, पतंग, माश्या, मधमाशी, यांसारख्या कीटकांच्या आणि कोळी, विंचू, खेकडे, गोचीड यांसारख्या अष्टपाद जीवांच्या कित्तेक प्रजाती आढळून येतत.

## 8. पिण्याच्या पाण्याची समस्या आणि उपाययोजना..

### (ग्रामपंचायत आरो प्लांट & खाजगी वाटर ए टी एम):- ( नाशिक )

1 ठाणगाव – 2 आर वो प्लांट खाजगी. उंबरदरा ल. पा. तलावातूल पाणी पुरवठा.

2 पाडळी – नाही, . उंबरदरा ल. पा. तलावातूल पाणी पुरवठा.

3 आशापूर - नाही, . उंबरदरा ल. पा. तलावातूल पाणी पुरवठा.

4 हिवरे – ग्रामपंचायत आर वो प्लांट. उंबरदरा ल. पा. तलावातूल पाणी पुरवठा.

5 पिंपळे - नाही, . उंबरदरा ल. पा. तलावातूल पाणी पुरवठा.

6 सोनेवाडी - नाही, सार्वजनीक विहीर.

7 चास -- नाही, सार्वजनीक विहीर.

8 कासारवाडी -- नाही, सार्वजनीक विहीर.

